# स्थानिक गुन्हे शाखेकडून अवघ्या ४८ तासात
# हायवेवरील जबरी चोरी व मोटर सायकल चोरी गुन्हा उघड

दिनांक ३१-०७-२०२० ते ०१-०७-२०२० रात्र दरम्यान सेलू ते वर्धा रोडवर रोडच्या बाजुला विश्रांतीकरीता थांबलेल्या ट्रक ड्रायव्हर यांना अंधाऱ्या रात्री चाकूचा धाक दाखवून तसेच ट्रकमध्ये झोपलेल्या ट्रक ड्रायव्हरच्या खिशातून कात्रीचा उपयोग करून नगदी रूपये व मोबाईल खिसा कापून जबरीने चोरून नेल्याचे रिपोर्टवरून सदरचा गुन्हा सेलू येथे नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, काही इसम वर्धा बस स्टॉप जवळील इदगाहा मैदानामध्ये झोपड्या टाकून राहत आहे व त्यामधील हैद्राबाद येथून आलेला शाहरूख उर्फ साहील उर्फ शेख रफी रा. पीएल नगर, हैद्राबाद हा त्यांचे इतर २ साथीदारांसह शहरालगतच्या परिसरात मोटर सायकल चोरून सेलू ते वर्धा दरम्यानच्या नागपुर हायवेवर जबरी चोरी करीत आहेत. त्या अनुषंगाने शहरालगतच्या भागात पेट्रोलींग करून इदगाहा मैदानाच्या मागिल भिंतीजवळ पाल टाकून राहत असलेल्या वस्तीवर जावून छापा घालून आरोपी नामे १) शाहरूख उर्फ साहील उर्फ शेख रफी, वय १९ वर्ष, रा. पीएल नगर, हैद्राबाद व त्याचे २ साथीदार नामे २) संजिव उर्फ पाटील रामू शिंदे, वय २० वर्ष, रा. रेहकी सेलू ह. मु. वर्धा ३) नेमेरी राजू पवार उर्फ रेड्डी, वय २० वर्ष, रा. दहेगाव रेल्वे यांना ताब्यात घेवून त्यांचे झोपडयांची झडती व त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून ११ मोबाईल, २ सिझर कैची, १ चाकू, नगदी १५०० रू तसेच त्यांचे झोपडयाचे बाजुला संशयीत रित्या ठेवून असलेल्या 6 मोटर सायकल असा एकूण जु. किंमत १,८०,६५० रू चा माल जप्त करण्यात आला. सदर आरोपीतांकडून पोलीस स्टेशन सेलू येथील जबरी चोरीचा गुन्हा तसेच पो.स्टे. वर्धा शहर व पो.स्टे. सावंगी असे मिळून चोरीचे एकूण ९ गुन्हे आणि पो.स्टे. बुट्टीबोरी येथील चोरीचा १ गुन्हा असे एकूण १० गुन्हे उघडकीस आलेले आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. बसवराज तेली, अपर पोलीस अधीक्षक श्री. निलेश मोरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. निलेश ब्राम्हणे, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांचे निर्देशांप्रमाणे सहा. पोनि. महेंद्र इंगळे, पोउपनि. आशिष मोरखडे, यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन पथक प्रमुख सलाम कुरेशी, निरंजन वरभे, नरेंद्र डाहाके, संतोष दरगुडे, गजानन लामसे व पथकातील कर्मचारी तसेच सायबर सेल वर्धा यांनी केली.